# महाराष्ट्र अभियांत्रिकी स्थापत्य सेवा, गट-ब, परीक्षा-२०१२ (अनुशेष)
## जाहिरात क्रमांक २४६/२०१२
### घोषणा

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा व लाभक्षेत्र विभागातील सहायक अभियंता, गट-ब, श्रेणी-२ पदावरील भरतीकरिता दिनांक २० जून, २०१२ रोजी विज्ञापित करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्रस्तुत परीक्षा, पूर्व, मुख्य तसेच मुलाखत या तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येईल, असे घोषित करण्यात आले होते. तथापि, सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या तुलनात्मकदृष्टया खूपच कमी प्रमाणावर असल्यामुळे दि.५ ऑगस्ट २०१२ रोजी घेण्यात येणारी महाराष्ट्र अभियांत्रिकी स्थापत्य, सेवा गट-ब (पूर्व) परीक्षा २०१२ रद्द करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आणि दिनांक २० जून २०१२ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन विहित कालावधीत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना दि.११ नोव्हेंबर २०१२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी स्थापत्य सेवा, गट-ब (मुख्य) परीक्षा २०१२ करिता थेट प्रवेश देण्यात येईल अशी घोषणा दिनांक १७ जुलै, २०१२ रोजी करण्यात आली होती.

तथापि, काही प्रशासकीय कारणास्तव सदर परीक्षा दिनांक ११ नोव्हेंबर २०१२ ऐवजी दि. १५ व १६ डिसेंबर २०१२ रोजी घेण्यात येणार आहे. जाहिरातीतील परिच्छेद क्र. ४.३.७ नुसार अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक १५ डिसेंबर, २०१२ पूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची मुख्य परीक्षेकरिता उमेदवारी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

मुंबई
दिनांक :- १८ ऑक्टोबर, २०१२

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

More downloads and guidance @
www.omkarshendure.com ( AEE )